1. धारेश्वर शिक्षण संस्था कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत घेण्यात येत असलेले ग्राम-शहर विकासासाठी युवा हया सात दिवशीय विशेष शिबीराचे उद्‌घाटन धारेश्वर शिक्षण संस्था संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मानीनय डॉ. टी.पी. पाटील साहेब व प्रमूख पाहूणे आणि मार्गदर्शक डॉ. प्रेमिला मुखेडकर मॅडम, रा.से.यो. गट समन्वयक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तसेच मौजे गणेशपूर येथील प्रथम नागरिक, पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच ज्याच्यासाठी व ज्याच्याशिवाय हे शिबीर यशस्वी होऊ शकत नाही असे आमचे स्वंयसेवक यांच्या साक्षीने थाटात करण्यात आले. याप्रंसगी कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले व संचालन प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी केले तर उद्‌घाटन प्रसंगी उपस्थितांचे अभार डॉ. पुरुषोत्तम मनगटे, समाजशास्त्र विभाग प्रमूख यांनी मानले. यावेळी मोठया संख्येने पंचक्रोशीत ग्रामस्थ, पदाधिकारी, रासेयो स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील सहकारी उपस्थित होते.

२. रासेयो विशेष शिबीराच्या दुस-या दिवशी दि.१८/०१/२०२३ रोजी मौजे गणेशपूर येथे श्रमंस्कार म्हणून बाल विवाह प्रतिबंध कार्यक्रमाविषयी जन जागृती करण्यात आली या प्रसंगी स्वंयसेवकानी गावातून रॅली काडून बाल विवाह थांबवण्या विषयी अनेक घोषणा देवून गावगर्जना केली. शिवाय शिबीर स्थळी विशेष पोस्टर स्वंयसेवकानी स्वंःता तयार करुन दर्शनी भागात लावले व स्वच्छ गाव सुंदर गाव अशी नारे देत ग्राम स्वच्छता केली. दुपारच्या बौद्दिक सत्रात बालविवाह निर्मूलन व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रमूख पाहुणे म्हणून श्री बाळकृष्ण भारत साळुंके, प्रकल्प समन्वयक-युनिसेफ, एसबीसी-३ जि. जालना. व डॉ. कल्पना देशमूख मॅडम, संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद हया उपस्थित होत्या. सदर दोन्ही शिबीर मार्गदर्शकांनी बाल विवाह प्रतिबंध मोहिमे विषयी अतिशय सविस्तर व उत्कृष्ठ मार्गदर्शन करुन स्वंयसेवकांची मने जिंकून घेतली. प्रसंगी महाविद्यालयातील संपूर्ण स्टाफ, रासेयो स्वंयसेवक ग्रामस्थ, पदाधिकारी, मोठया संख्येने व उत्साहाने सहभागी होते.

३. धारेश्वर शिक्षण संस्था कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत घेण्यात येत असलेले सात दिवशीय विशेष शिबीराच्या तिस-या दिवशी दिनांक १९/०१/२०२३ रोजी संकाळच्या श्रमसंस्कार सत्रात मौजे गणेशपूर येथून ३ कि.मी पायी डोंगरावर जाऊन जल सवंर्धनाचे महत्व ओळखून पशू-पक्षासाठी पाणी आवश्यक असल्याने तिथे चर खोदून बांध निर्माण करण्यासाठी स्वंयसेवकांनी श्रमदान केले. दुपारच्या बौध्दीक सत्रात नैसर्गीक शेती, गट शेती व शासन स्तरावरील कृषी योजना याविषयी येथील ग्रामस्थ व स्वंयसेवकांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमूख पाहूणे म्हणून प्रगतशिल शेतकरी श्री. अजय जाधव उपस्थित होते. यांनी शेंद्रीय शती, नैसर्गिक शेती यावर अतिशय मोलोच मार्गदर्शन केले. तर श्री. लक्ष्मण काळे, श्री. सुभाष शिरसाठ, कृषी पर्यवेक्षक यांनी कृषी विषयक शासनाची धोरणे आणि शेताचा व शेतक-यांचा विकास यावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर होते यांनी अध्यक्षीय समारोप करतांना असे म्हटले की, नैसर्गिक शेती, शेंद्रीय शेती ची सुरुवात करतांना आपली जमीन पहिल्यादा चार वर्षे पडीत ठेवावी लागते त्यापुढे जाऊन नैसर्गिक शेती, शेंद्रीय शेती कसण्याचा विचार शेतक-यांना करावा लागतो. म्हणून शेतक-यांनी नैसर्गिक शेती, शेंद्रीय शेतीच्या माध्यमांतून शाश्वात विकास करुन

घ्यावयाचा असल्यास ***आपल्याकडे चार एकर शेती असल्यास त्यातील एक एकर चार वर्षासाठी पडीत ठेवून बाकीच्या शेतीवर आपला उदरनिर्वाह करावा आणि त्यानंतर*** नैसर्गिक शेती, शेंद्रीय शेती कडे वळावे आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये, वाडत्या रसायनयूक्त शेती कडून बाजूला होऊन सशक्त अन्न मिळून आपले आरोग्य सांभाळे तरच आपला व देशाचा शाश्वत विकास करता येईल असे प्रतिपादन केले.

४. रासेयो विशेष शिबीराच्या चौथ्या दिवशी दि.२०/०१/२०२३ रोजी मौजे गणेशपूर येथे श्रमंस्कार म्हणून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी यादेशाचा मतदार जागृत असने अत्यंत गरजेचे आहे म्हणून नव मतदार जागृत होण्यासाठी जन जागृती करण्यात आली या प्रसंगी स्वंयसेवकानी गावातून रॅली काडून मतदान व नवमतदान नोंदणी विषयी अनेक घोषणा देवून गावगर्जना केली. शिवाय शिबीर स्थळी विशेष पोस्टर स्वंयसेवकानी स्वं:ता तयार करुन दर्शनी भागात लावले होते. त्याशिवाय हे कार्य पूर्ण करुन डोंगरावरील बांध निर्माण करण्याचे कार्य चालू असल्याने तिथे परत जाऊन स्वंयसेवकानी श्रमदान केले. दुपारच्या बौध्दीक संस्कार शिबीर सत्रात, मतदार जागृती काळाची गरज याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी मार्गर्शक डॉ. एकनाथ खरात, राज्यशास्त्र विभाग यंशवत महाविद्यालय सिल्लोड हे उपस्थित राहून ग्रामस्थ व स्वंयसेवकांना उत्कृष्ठ मार्गदर्शन केले. डॉ. एकनाथ खरात म्हणले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जनतेला एक अत्यंत महत्वाचा आणि मौलिक अधिकारी बहाल केला आहे. ज्यामूळे सर्व देश जनतेच्या हाती आला आहे. ***ते म्हणजे एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य हे आहे. म्हणून भारतीय नागरिकांनी मताचे मूल्य ओळखून जातीयेत्तला बळी न पडता, भ्रष्टाचार विरहित, नि:पक्ष आणि सदसदविवेक बुध्दीने मतदान करुन राष्ट्राचा व आपला विकास घडवून आणावा. त्याच बरोबर भारतीय राज्यघटनेचे महत्व समजून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया विषयाचा अभ्यास निश्चितपणे समजून घ्यावा कारण यामध्ये प्रत्येक मुद्दयाच अतिशय सुंदर विश्लेषण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल आहे. म्हणून विद्यार्थांनी याचा निश्चितपणे अभ्यास करावा आणि हे साहित्य तुमच्या खिशात असलेल्या मोबाईल मध्ये, युटयुब वर सुध्दा उपलब्ध आहे असे आवाहन केले. तर सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर यांनी भारतीय लोकशाही हे जगातील सर्वात बलशाली आणि लिखित राज्यघटना असून या देशांमध्ये अनेक विविधता असतांना या देशातील लोकशाहीला जगात सर्वात महान मानले जात परंतू सध्या देशाच्या लोकशाही समोर अनेक आव्हान निर्माण होत आहेत कारण येथील नागरिक कायदे व नियमांना न मानता पळवाटा काढत आहेत, कायदे मोडत आहेत. कायदे मोडत आहेत म्हणून आज भारतीय युवकांना व नागरिकांना इंग्लड या राष्ट्रा प्रमाणे अलिखीत राज्यघटना असून सुध्दा येथील लोक संकेत पाळतात, नियम पाळतात या प्रमाणे भारतीय नागरिकांनी बोध घेऊन राज्यघटनेची उद्देश प्रत्रिका व नियम आणि अटीशी प्रमाणिक राऊन आपल्या देशाच्या लोकशाहीचे सबलीकरण करावे असे प्रतिपादन केले.***

५. धारेश्वर शिक्षण संस्था कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत घेण्यात येत असलेले सात दिवशीय विशेष शिबीराच्या पाचव्या दिवशी दिनांक २१/०१/२०२३ रोजी संकाळच्या श्रमसंस्कार शिबीरामध्ये स्वयंसेवकांनी ॲग्रो टुरिझम आणि शैक्षणिक सहल म्हणून मौजे जामडी येथील डॅमला भेट देऊन जल

व्यवस्थापनाचे, जल संवर्धनाचे महत्व समजून घेतले. दुपारच्या बौध्दीक सत्रात मुलीचे स्वं-संरक्षण आणि महिला सक्षमीकरण वास्तव आणि आशावाद याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी प्रमूख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्रीमती कोमल शिंदे मॅडम (API पिशोर पोलीस स्टेशन) व डॉ. सुधारक श्रीरामे लोकप्रशासन विभाग, सरस्वती भूवन कॉलेज औरंगपुरा औरंगाबाद हे उपस्थित राहून अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. श्रीमती शिंदे मॅडम म्हणाल्या की, शिक्षण म्हणजे नौकरी नसून उत्तम जीवन जगण्याचे साधन आहे. शिक्षण हे तुम्हाला समाज माणूस म्हणून समाजात वावरण्याचे निती नियम शिकवते असे सामाजिक, व्याव्हारीक ज्ञान स्वंयसेवकांना देण्या बरोबरच कायद्याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करतांना त्यांनी केरळ, तामिळनाडू येथे मुलीच हॉटेल चालवतात, मुलीच सेवा देतात सकाळी सात वाजता हॉटेल चालू करुन संध्याकाळी बरोबर सात वाजता बंद करतात हे करत असतांना त्यांनी आपली संस्कृती सोडली नाही. त्या महिला, मुली हया कपडयाने अधुनिक नाही तर विचाराने, व्यव्हाराने अधुनिक होत आहेत. प्रगतिच्या वाटेवर, मार्गावर त्या चालत आहेत. त्यामूळे मुलीनी आपली संस्कृती न सोडता आपल्या आई-वंडीलाचा विचार करुन आपले अस्तित्व आपण निर्माण करण्यासाठी आहोरात्र प्रयत्न करावेत असे अमुल्य विचार त्यांनी शिबीरातील स्वंयसेवकांना दिले. तसेच आजच्या युवकांनी नौकरीच्या भरोश्यावर अवलंबून न राहता शेती पांरपारीक पध्दतीने न करता अधुनिक पध्दीतीने करावी असा सल्ला देऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करतांना ग्रॅज्यूएशन पासूनच अभ्यास करावा पुढे फार उशीर होतो वयाची बरचशी वर्षे वाया जातात असाही मोलाचा सल्ला शिबीरातील युवक, युवतींना दिला. आजच्या मुलीच्या हातात पुढील समाज कसा घडवावा हे महत्वाचे हत्यार तुमच्या हातात आहे. म्हणून मुंलीनी मार्केट मध्ये गेल्या नंतर केवळ डेस व मेकपचे सामानच खरेदी न करता अभ्यासाची पुस्तके, विचारवंताची पुस्तके घ्यायला शिका आणि ती दररोज संध्याकाळी मोबाईल न बघता आठवणीने वाचायला शिका असा मोलाचा सल्ला मुलींच्या भवितत्वयासाठी दिला. तदनंतर विशेष शिबीर सत्रातील दुसरे मार्गदर्शक डॉ. सुधारक श्रीरामे **यांनी** महिला सक्षमीकरण वास्तव आणि आशावाद याविषयी बोलतांना प्रांचीन ग्रंथाचा संदर्भ देत प्रांचीन कालखंडात स्त्रींयाना अत्यंत महत्वपूर्ण स्थान होते परंतू मध्ययुगीन कालखंडात धर्म आणि सत्तेच्या नावावर राजकारण केले गेले त्यामध्ये स्त्रियांना अत्यंत गौण स्थान दिले गेले. त्यामूळे मध्ययुगीन कालखंड हा स्त्रियांच्या बाबतीत अत्यंत वाईट राहिला आहे. आधुनिक कालखंडात म्हणजे १९६० नंतर महिला सक्षमीकरणाची सुरुवात झाली तेंव्हा पहिल्यांदा अमेरिकेत वमून स्टडी सेंटर निर्माण झाले आज संपूर्ण क्षेत्रात महिला सक्षम आहेत ते म्हणजे संगणकापासून अभियांत्रिकी पर्यंत, समाजसेवे पासून वैद्यकीय सेवा पर्यंत महिला सक्षम झालेल्या दिसून येत आहेत. तरी परंतू आज भारतात जगातील इतर राष्ट्रापेक्षा भारतातील महिलावर आत्ताचाराचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. एवढया बलशाली लोकशाही राष्ट्रांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या गप्पा कुठल्या आधारावर केल्या जातात हा मोठा प्रश्न निर्माण होतो आहे. महिलांना सर्व क्षेत्रात स्थान देण्यामध्ये स्वीडन हा दुस-या क्रमांकाचा देश आहे तर भारताचा क्रमांक ९८ वा आहे. मग हि विसंगती कशामूळे यावर विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. आज आधुनिक युगात स्त्री जागृत झाली आहे. महिलाना सर्वच क्षेत्रात प्रगती करण्याचा हक्क आहे. आपण सगळयानी मिळून स्त्रियांना शिक्षण, राजकारण, सत्ता, मानसन्मान मिळवून देण्यात सहकार्य न करता त्यांचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे असे आव्हान करुन ज्या देशातील स्त्री शिक्षीत होणार नाही त्या देशाचा विकास कधीच होऊ शकत नाही असे

मौलिक विचार याप्रसंगी व्यक्त करुन त्यांनी आजच्या महिला सक्षमीकरणातील स्त्रियांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, राजकीय, कृषी विषयक क्षेत्रातील स्थितीवर सविस्तर प्रकाश टाकला. तर सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अध्यक्षीय समारोप डॉ. विक्रमसिंह पवार सर यांनी केला. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिवशंभू ग्रूपचे सर्व स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड आणि महाविद्यालयातील सहकारी मित्र यांनी केले.

६. रासेयो विशेष शिबीराच्या सहाव्या दिवशी दि.२२/०१/२०२३ रोजी मौजे गणेशपूर येथे सकाळच्या श्रमंस्कार शिबीरामध्ये स्वातंत्र्य सेनानी कै. पुंजाजी भागाजी सपकाळ यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबिरामध्ये एकून १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर होते तर प्रमूख पाहुणे म्हणून लोकमान्य ब्लड बँकेचे विजय सोनवणे सर यांनी रक्तदानाचे महत्व स्वयंसेवकांना सांगितले तदनंतर दुपारच्या सत्रात सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमामध्ये शिबीरातील विद्यार्थ्यांसह येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने सहभाग घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवशीय विशेष शिबीराचा सहावा दिवस अत्यंत आनंदमय केला. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. उमाकांत गायकवाड यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी यांनी मानले.

७. धारेश्वर शिक्षण संस्था कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत घेण्यात येत असलेले ग्राम-शहर विकासासाठी युवा हया सात दिवशीय विशेष समारोप समांरभाचे प्रमूख पाहूणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक आदनीय डॉ. आंनद देशमूख होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर होते. तसेच मौजे गणेशपूर येथील प्रथम नागरिक, पदाधिकारी, ग्रामस्थ आणि ज्याच्यासाठी व ज्याच्याशिवाय हे शिबीर यशस्वी होऊ शकत नाही असे आमचे स्वंयसेवक सहकारी मित्र यांच्या साक्षीने समारोप समारंभ संपन्न करण्यात आला. याप्रंसगी सात दिवशीय विशेष शिबीराचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मांडला तदंनतर नियमीत कार्यक्रमातील उत्कृष्ठ सहभाग तसेच रक्तदात्याचे प्रमाणपत्र आणि ंसात दिवशीय विशेष शिबीरात उल्लेखनीय कामगीरी करणा-या स्वयंसेवकांना मान्यवराच्या हस्ते पारितोषीक, ट्राफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. उमाकांत गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी उपस्थितांचे अभार डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी मानले. यावेळी मोठया संख्येने पंचक्रोशीत ग्रामस्थ, पदाधिकारी, रासेयो स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील सहकारी उपस्थित होते. एकूनच सात दिवशीय विशेष शिबीरात मौजे गणेशपूर येथील ग्रामस्थ, पदाधिकारी तसेच स्वंयसेवकांनी व महाविद्यालयातील सहकारी मित्रांनी रासेयो शिबीरास भरभरुन प्रतिसाद दिला त्याबद्दल मानापासून सर्वांचे आभार व धन्यवाद!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद व
धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं.

ता.कन्नड जि.औरंगाबाद (नॅक मूल्यांकन 'बी' दर्जा प्राप्त)
यांच्या संयुक्त विद्यामाने

आजादी का अमृत महोत्सव

## राष्ट्रीय सेवा योजना

आजादी का अमृत महोत्सव

## "युवकांचा ध्यास ग्राम व शहर विकास"

सात दिवसीय विशेष शिबीर दिनांक १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२३

* उद्घाटन समारंभ *

* उदघाटक *
मा.डॉ.टी.पी.पाटील
(सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी)

* प्रमुख पाहुणे *
मा.श्री. डॉ. आनंद देशमुख
(संचालक, रा.से.यो. विभाग)
डॉ.बा.आ.म.विद्यापीठ,औ.बाद.

* कार्यक्रमाचे अध्यक्ष *
सौ.कंचनाबाई अजबसिंग चराथंडे
(सरपंच, गणेशपूर)

शिबीर स्थळ मौजे :- गणेशपूर, ता.कन्नड जि.औरंगाबाद.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद व
धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं.

ता.कन्नड जि.औरंगाबाद (नॅक मूल्यांकन 'बी' दर्जा प्राप्त)
यांच्या संयुक्त विद्यामाने

आजादी का अमृत महोत्सव

## राष्ट्रीय सेवा योजना

आजादी का अमृत महोत्सव

## "युवकांचा ध्यास ग्राम व शहर विकास"

सात दिवसीय विशेष शिबीर दिनांक १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२३

* शिबीर समारोप *

* कार्यक्रमाचे अध्यक्ष *
प्राचार्य संदिप पाटील भैय्या
(जिल्हा परिषद सदस्य)

* प्रमुख पाहुणे *
डॉ.ज्ञानेश्वर पाथ्रीकर
(रा.से.यो. जिल्हा समन्वयक ) डॉ.बा.आ.म.विद्यापीठ,औ.बाद.

शिबीर स्थळ मौजे :- गणेशपूर, ता.कन्नड जि.औरंगाबाद.

✲ निमंत्रक पत्रिका ✲

बुक-पोस्ट

प्रती,

श्री./सौ. ____________________

____________________

____________________

____________________

आज़ादी का अमृत महोत्सव

**Not Me, But You...!**

❖ प्रेषक ❖

## डॉ. दिनकर टकले

(प्राचार्य)

सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं.)

---

आज़ादी का अमृत महोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व

धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

## कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं.

ता. कन्नड जि. औरंगाबाद

(नॅक मूल्यांकन 'बी' दर्जा प्राप्त)

यांच्या संयुक्त विद्यमाने

# राष्ट्रीय सेवा योजना

## "युवकांचा ध्यास ग्राम व शहर विकास"

## सात दिवसीय विशेष शिबीर

दिनांक १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२३

❖ शिबीर स्थळ ❖

**गणेशपूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद.**

❖ विनीत ❖

**डॉ. दिनकर टकले**

(प्राचार्य)

| | |
|---|---|
| डॉ. गजानन चिट्ठेवाड<br>(कार्यक्रमाधिकारी व रा.से.यो. गट समन्वयक)<br>डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा. प्रतिभा आघाडे<br>(कार्यक्रमाधिकारी) |

डॉ. [illegible] (रा.से.यो. समिती) डॉ. पुरुषोत्तम [illegible] (रा.से.यो. समिती) डॉ. अमिता [illegible] (रा.से.यो. समिती) डॉ. [illegible] (रा.से.यो. समिती)

सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लिं.)

---

❖ उद्घाटन समारंभ ❖

दिनांक १७ जानेवारी २०२३, सकाळी १० वा.

| ❖ उद्घाटक ❖ | ❖ प्रमुख पाहुणे ❖ |
|---|---|
| मा. डॉ. टी. पी. पाटील<br>(सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी) | मा. श्री. डॉ. आनंद देशमुख<br>(संचालक, रा.से.यो. विभाग)<br>डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औ.बाद. |

❖ कार्यक्रमाचे अध्यक्ष ❖

श्री. कांचनाबाई [illegible]

(सरपंच, गणेशपूर)

❖ प्रमुख उपस्थिती ❖

श्री. [illegible] (चेअरमन)
श्री. [illegible]
सौ. [illegible] (सदस्य)
श्री. [illegible] (सदस्य)
सौ. [illegible] (सदस्य)
सौ. [illegible] (सदस्य)
श्री. [illegible] (सदस्य)
सौ. [illegible] (सदस्य)
श्री. [illegible] (सदस्य)
सौ. [illegible] (सदस्य)
श्री. [illegible] (सदस्य)
श्री. [illegible]
श्री. [illegible]
श्री. [illegible]

सौ. [illegible] (उपसरपंच, गणेशपूर)
शेख [illegible] (व्हा. चेअरमन)
श्री. [illegible] (पोलीस पाटील)
श्री. [illegible] (तंटामुक्ती अध्यक्ष)
श्री. [illegible]
(अध्यक्ष गणपती संस्थान)
श्री. [illegible] (सचिव ग.स.)
श्री. [illegible] पुजारी (ग.स.)
[illegible]
श्री. [illegible]
श्री. [illegible]
श्री. [illegible]
श्री. [illegible]

माजी विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना

श्री. बाबू पवार श्री. सुनिल गिरी, श्री. विनोद गिरी, श्री. अंकुश ठाकरे, प्रविण [illegible]

प्रकाश मोरे, रा. गणेशपूर

समस्त ग्रामस्थ व जि.प.प्रा.शाळा, गणेशपूर व समस्त पंचक्रोशितील ग्रामस्थ

❖ शिबीर समारोप ❖

दिनांक २३ जानेवारी २०२३, सकाळी १० वा.

| ❖ कार्यक्रमाचे अध्यक्ष ❖ | ❖ प्रमुख पाहुणे ❖ |
|---|---|
| प्राचार्य संदिप पाटील [illegible]<br>(जिल्हा परिषद सदस्य) | डॉ. ज्ञानेश्वर [illegible]<br>(रा.से.यो. जिल्हा समन्वयक)<br>डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औ.बाद. |

❖ विशेष सहकार्य ❖

पत्रकार

श्री. [illegible] (दै. लोकमत) श्री. [illegible] (दै. सकाळ) श्री. [illegible] (दै. [illegible])

---

## श्रम संस्कार शिबीरातील कार्यक्रम व व्याख्याने

सकाळी ८ ते ११ श्रमदान आणि दुपारी १ ते ३.३० प्रबोधन

तसेच रात्री ८ ते ९.३० पर्यंत सायंकालिन कार्यक्रम

| दिनांक/वार | बौद्धिक सत्र | विषय | सायंकालीन कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १७/०१/२०२३ मंगळवार | उद्घाटक<br>मा. डॉ. टी. पी. पाटील<br>(सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी)<br>मा. श्री. डॉ. आनंद देशमुख<br>(संचालक, रा.से.यो. विभाग)<br>डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औ.बाद. | उद्घाटन समारंभ | [illegible] |
| १८/०१/२०२३ बुधवार | श्री. [illegible]<br>श्री. [illegible]<br>([illegible] कृषी अधिकारी)<br>श्री. [illegible]<br>(कृषी [illegible]) | [illegible] आणि नैसर्गिक शेती<br>व कृषी योजना | [illegible] अनुभव |
| १९/०१/२०२३ गुरुवार | डॉ. [illegible]<br>([illegible])<br>डॉ. [illegible]<br>([illegible]) | बाल विवाह आणि आरोग्य | मानसिक आरोग्य [illegible] |
| २०/०१/२०२३ शुक्रवार | डॉ. [illegible]<br>([illegible]) | मतदार जनजागृती काळाची गरज | सांस्कृतिक कार्यक्रम |
| २१/०१/२०२३ शनिवार | [illegible]<br>([illegible])<br>डॉ. [illegible]<br>([illegible]) | [illegible] | शिबीरातील अनुभव |

दिनांक २२ जानेवारी २०२३, सकाळी १० ते १

स्वातंत्र्य सैनिक

**कै. पुंजाजी भागाजी सपकाळ यांच्या स्मरणार्थ**

रक्तदान शिबीर

लोकमान्य ब्लड बँक, औरंगाबाद.

दिनांक 17/01/2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर मौजे गणेशपूर उद्घाटन समारंभ प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. टी.पी.पाटील, प्रमूख मार्गदर्शक डॉ. प्रेमिला मुखेडकर रासेयो गट समन्वयक व प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर, गणेशपूर येथील प्रथम नागरिक संरपच रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी आणि ग्रामस्थ कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करतांना.



कार्यक्रमाचे प्रमूख पाहूण्या बरोबर दिप प्रज्वलन करतांना रासेयो स्वंयसेवक विद्यार्थीनी





*रा.से.यो. विशेष शिबीराचे उद्घाटक मा. डॉ. टी. पी. पाटील साहेब यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड.*



रा.से.यो. विशेष शिबीराचे प्रमूख पाहूणे डॉ. प्रेमिला मुखेडकर रासेयो गट समन्वयक यांचे स्वागत करतांना डॉ. अनिता खंडागळे मॅडम.





रा.से.यो. विशेष शिबीरात उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर यांचे स्वागत करतांना डॉ. डॉ. पुरुषोत्तम मनगटे. रा.से.यो. विशेष शिबीराचे संचालन करतांना प्रा.प्रतिभा आघार्डे





रा.से.यो. विशेष शिबीराचे प्रस्ताविक करतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड.





रा.से.यो. विशेष शिबीरात डॉ. प्रेमिला मुखेडकर मॅडम स्वंयसेवक व उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना.





रा.से.यो. विशेष शिबीरात उद्घाटन पर अध्यक्षीय भाषण व मार्गदर्शन करतांना डॉ. टी. पी. पाटील साहेब.





रासेयो विशेष शिबीरास शुभेच्छा व मार्गदर्शन करतांना महाविद्यलायाचे प्राचार्य डॉ.दिनकर टकले सर.





*रा.से.यो. विशेष शिबीर उद्‌घाटन कार्यक्रमात उपस्थितांचे अभार व्यक्त करतांना डॉ.पुरुषोत्तम मनगटे.*



*मौजे गणेशपूर येथे रा.से.यो. विशेष शिबीर उद्‌घाटन कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली या प्रसंगी मंचावर उपस्थित प्रमूख पाहूणे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकरी, प्राचार्य,स्वंयसेवक आणि ग्रामस्थ आदी.*



मौजे गणेशपूर येथे रा.से.यो. विशेष शिबीरात भोजन करतांना येथील संरपच कार्यक्रमाचे उद्घाटक, प्रमूख पाहूणे, प्राचार्य व उपस्थित ग्रामस्थ,सदस्य आणि स्वंयसेवक दिनांक 17/01/2023.







रा.से.यो. विशेष शिबीरात भोजन करतांना ग्रामस्थ, स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील स्टाफ








*रा.से.यो. विशेष शिबीराच्या दुस-या दिवशी दि.१८/०१/२०२३ रोजी श्रमसंस्कार शिबीरात सकाळी ८.३० ला बाल विवाह प्रतिबंध मोहीमे विषयी मौजे गणेशपूर येथे रॅली काढून जन जागृती केली व तद्नंतर डोंगरावर पशु-पक्षी यांना पिण्यासाठी पाणी आवश्यक असल्याने तिथे बांध निर्माण करण्यासाठी श्रमदान कार्यास सुरुवात करण्यात आली.*



***रा.से.यो. विशेष शिबीराच्या दुस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात डोंगरावर पशु-पक्षी यांना पिण्यासाठी पाणी आवश्यक असल्याने तिथे बांध निर्माण करण्यासाठी श्रमदान करतांना स्वंयसेवक, ग्रामस्थ आणि कार्यक्रमाधिकारी आदी.***




***रा.से.यो. विशेष शिबीराच्या दुस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात डोंगरावर पशु-पक्षी यांना पिण्यासाठी पाणी आवश्यक असल्याने तिथे बांध निर्माण करण्यासाठी श्रमदान करतांना स्वंयसेवक, ग्रामस्थ आणि कार्यक्रमाधिकारी आदी.***








रा.से.यो. विशेष शिबीराच्या बौध्दीक सत्रात प्रमूख पाहूण्याचे स्वागत करण्यासाठी सभा मंडपाच्या दर्शनी भागात स्वंयसेवक विद्यार्थीनीने काडलेली रांगोळी या प्रसंगी उपस्थित बौध्दीक सत्राचे मार्गदर्शक पाहूणे.




श्री बाळकृष्ण सांळूके युनिसेफ प्रकल्प समन्वयक डॉ. कल्पना देशमूख यांचे स्वागत करतांना शिबीरातील स्वंयसेवक



श्री बाळकृष्ण सांळूके युनिसेफ प्रकल्प समन्वयक, एसबीसी-३ जि. जालना शिबीरात बाल विवाह प्रतिबंध याविषयावर स्वंयसेवक व ग्रामस्थ यांना मार्गदर्शन करतांना क्षण.



रा.से.यो. विशेष शिबीराच्या दुस-या दिवशी दि.१८/०१/२०२३ रोजी श्रमसंस्कार शिबीरात सकाळी ८.३० ला बाल विवाह प्रतिबंध मोहीमे विषयी मौजे गणेशपूर येथे रॅली काढून जन जागृती केली त्याच बरोबर स्वंयसेवक व स्वंयसेविका यांनी बाल विवाह थांबवा या आशयाचे अनेक विविध पोस्टरस तयार करुन शिबीर स्थळी लावले होते त्यांनी केलेल्या कार्याचे परिक्षण करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री बाळकृष्ण सांळूके युनिसेफ प्रकल्प समन्वयक जि. जालना डॉ. कल्पना देशमूख यांनी प्रथम, व्दितीय क्रमाक काडले व सर्वच स्वंयसेवकांनी अतियश सुंदर पोस्टरस तयार केल्याचे कौतूक केले या प्रसंगी उपस्थित रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, प्रा. प्रतिभा आघार्डे, डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. वंदना बनकर आदी.












*मौजे गणेशपूर रासेयो विशेष शिबीरातील बाल विवाह थांबवा अशी स्वंयसेवकानी तयार केलेल्या पोस्टरचे परिक्षण करतांना परिक्षक डॉ. कल्पना देशमूख मॅडम, संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद.*



*बाल विवाह थांबवा या पोस्टरचे परिक्षक यांना महत्व वर्णन करुन सांगतांना रासेयो स्वंयसेवक*



This is a photo from a Stop Child Marriage rally organized during the NSS Special Camp at Ganeshpur."

सक्षम
SAKSHAUM
महाराष्ट्रातील बाल विवाह निर्मूलन




# एका उज्वल भविष्यात बाधा आणू नका!
# बाल विवाह होऊ देऊ नका!

## प्राधान्य द्या शिक्षणाला
## नकार द्या बाल विवाहाला

कारण प्रत्येक मुलाला व मुलीला सुखी बालपण,
शिक्षण व स्वप्न पूर्ण करण्याचा अधिकार आहे

बाल विवाह रोखण्यासाठी १०९८ वर संपर्क साधा

- १८ वर्षाखालील मुलीचा आणि २१ वर्षाखालील मुलाचा विवाह करणे कायद्याने गुन्हा आहे.
- बालपणातील गर्भारपणामुळे आई व बाळाच्या जीवाला धोका होऊ शकतो किंवा बाळाची वाढ खुंटू शकते.
- शिक्षणाने बाल विवाहासारखी प्रथा थांबू शकते आणि आर्थिक व सामाजिक प्रगती होऊ शकते. शिका व शिकवा.

महाराष्ट्र शासन

SBC

unicef
for every child

रा.से.यो. विशेष शिबीराच्या तिस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात डोंगरावर बांध निर्माण करण्यासाठी श्रमदान करतांना स्वंयसेवक यावेळी उपस्थित डॉ. संजय मगर व कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड आणि सर्व सहकारी













*रा.से.यो. विशेष शिबीराच्या तिस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात डोंगरावर बांध निर्माण करण्यासाठी श्रमदान करतांना स्वंयसेवक यावेळी उपस्थित कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड आणि सर्व सहकारी मित्र*













*मौजे गणेशपूर येथे बाधावर दगड व माती व्यवस्थीत लावतांना रासेयो स्वंयसेवक.*

रा.से.यो. विशेष शिबीराच्या तिस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात श्रमदान करुन परततांना घेतलेला फोटो.



रा.से.यो. विशेष शिबीराच्या तिस-या दिवशी श्रमसंस्कार शिबीरात श्रमदान करुन परततांना घेतलेला फोटो.



रा.से.यो विशेष शिबीरात बंधाराचे प्रगती पथावर असलेले काम उपस्थित स्वंयसेवक, स्वंयसेविका व प्राध्यापक





रासेयो शिबीराच्या दुपारच्या बौध्दीक सत्रात बचत गट व नैसर्गिक शेती आणि शासनाच्या कृषी योजना याविषयावर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित प्रमूख पाहणूने श्री अजय जाधव प्रगतशिल शेतकरी व श्री जी.बी. शिरसाठ कृषी पर्यवेक्षक या प्रसगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर आदी.









कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर

*रासेयो विशेष शिबीराच्या चौथ्या दिवशी दि.२०/०१/२०२३ रोजी मौजे गणेशपूर गावातून नव मतदार जन जागृती रॅली काढून मतदान नोंदणी व मतदान नि:पक्ष पध्दतीने करावे असे आव्हान रासेयो स्वंयसेवकांनी येथील ग्रामस्थाना केले या प्रसगीची क्षणचित्रे उपस्थित कार्यक्रमाधिकारी व सहकारी मित्र.*









रासेयो शिबीराच्या दुपारच्या बौध्दीक सत्रात मतदार जन जागृती काळाची गरज व नव मतदार  याविषयावर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित प्रमूख पाहणूचे स्वागत व स्वंयसेवक स्वता होऊन मार्गदर्शक यांना भेट देतांनाचा क्षणचित्र.





रासेयो शिबीराच्या दुपारच्या बौध्दीक सत्रात मतदार जन जागृती काळाची गरज व नव मतदार  याविषयावर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित प्रमूख पाहुणे डॉ. एकनाथ खरात, राज्यशास्त्र विभाग, यशंवत महाविद्यालय सिल्लोड हे स्वंयसेवक व ग्रामस्थाना मार्गदर्श करतानाचा क्षण. **डॉ. एकनाथ खरात व डॉ. दिनकर टकले सर शिबीरात मतदार जन जागृती याविषयावर स्वंयसेवकांशी संवाद साधतांना...**





**कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांचे स्वागत करतांना स्वंयसेवक समाधान**





महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रसंगी स्वंयसेवकांशी व ग्रामस्थाशी मतदार जन जागृती काळाची गरज याविषयावर संवाद साधतांनाचे क्षणचित्र या प्रसंगी मंचावर उपस्थित कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व प्रमूख पाहूणे आदी.

# गणेशपूर येथे युवकांनी राबवली स्वच्छता मोहीम

## चिंचोलीच्या कला व विज्ञान महाविद्यालयातर्फे उपक्रम



गणेशपूर येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य दिनकर टकले.

**प्रतिनिधी** | शेलगाव

कला व विज्ञान महाविद्यालयाअंतर्गत घेण्यात येत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवशीय विशेष शिबिरात सकाळच्या श्रमसंस्कार शिबिरामध्ये गणेशपूर येथे स्वयंसेवकातर्फे ग्राम स्वच्छता करण्यात आली आणि याप्रसंगी नव मतदार जन जागृती रॅलीसुद्धा काढली. 'मतदार जागृती काळाची गरज' याविषयी सिल्लोडच्या यशवंत महाविद्यालयाचे प्रा. एकनाथ खरात यांनी मार्गदर्शन केले. प्रा. खरात म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जनतेला एक मौलिक आणि अत्यंत महत्त्वाचा अधिकार बहाल केला आहे. तो अधिकारी म्हणजे एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य हे आहे. म्हणून भारतीय नागरिकांनी मताचे मूल्य ओळखून जातीयत्तेला बळी न पडता, भ्रष्टाचार विरहित, नि:पक्ष आणि सदसदविवेक बुद्धीने मतदान करून राष्ट्राचा विकास घडवून आणावा, असे आवाहन केले. प्राचार्य दिनकर टकले यांनी भारतीय लोकशाही हे जगातील सर्वांत बलशाली आणि लिखित राज्यघटना असून या देशांमध्ये अनेक विविधता असताना या देशातील लोकशाहीला जगात सर्वांत महान मानले जात. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, प्रा. प्रतिभा आघाडे, डॉ. पुरुषोत्तम मनगटे, डॉ. अनिता खंडागळे, डॉ. योगेश भाले, डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. विक्रमसिंह पवार, डॉ. सुनील काळे, डॉ.यशवंत गाडे, डॉ. राजेश कांबळे, डॉ. संजय मगर, डॉ. वंदना बनकर, डॉ. वंदना पाटील, डॉ. संजय वाकळे, डॉ. रामेश्वर राऊत उपस्थित होते.



*मौजे गणेशपूर येथे ग्राम स्वछता करतांना शिबीरातील स्वंयसेवक, स्वंयसेवीका या प्रसंगी उपस्थित कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, प्रा.प्रतिभा आघार्डे डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. वंदना बनकर, डॉ. वंदना पाटील डॉ. संजय वाकळे आदी*



*२१/०१/२०२३ रोजी  संकाळच्या श्रमसंस्कार विशेष शिबीरामध्ये स्वयंसेवकांनी ॲग्रो टुरिझम आणि शैक्षणिक सहल म्हणून मौजे जामडी येथील वाटर डॅमला भेट देऊन जल व्यवस्थापनाचे, जल संवर्धनाचे महत्व समजून घेतले यावेळी उपस्थित रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड, डॉ. सुनिल काळे, डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. राजेश कांबळे व रासेयो स्वंयसेवक*



ॲग्रो टुरीझम आणि शैक्षणीक सहल म्हणून रासेयो विशेष शिबीरात वाटर डॅमला भेट देऊन जल व्यवस्थापनाचे, जल संवर्धनाचे महत्व समजून घेतले यावेळी उपस्थित रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड, सहकारी मित्र व स्वंयसेवक आदी.







२१/०१/२०२३ रोजी दुपारच्या बौध्दीक सत्रात मुलीचे स्वं-संरक्षण आणि महिला सक्षमीकरण वास्तव आणि आशावाद याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी प्रमूख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्रीमती कोमल शिंदे मॅडम (API पिशोर पोलीस स्टेशन) व डॉ. सुधारक श्रीरामे लोकप्रशासन विभाग, सरस्वती भूवन कॉलेज औरंगपुरा औरंगाबाद हे मौजे गणेशपूर विशेष शिबीरस्थळी उपस्थित राहून स्वंयसेवकांना व ग्रामस्थाना अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपस्थित सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विक्रमसिंह पवार सर आणि कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड आणि स्वंयसेवक राष्ट्रसत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्याचे क्षणचित्र.

*कार्यक्रमाचे प्रमूख पाहुणे श्रीमती कोमल शिंदे व डॉ. सुधारक श्रीरामे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वांगत करतांना स्वंयसेवीका कु. कार्तिकी सपकाळ आदी.*




***मुलीचे स्वं-संरक्षण यावि‍षयी मार्गदर्शन करतांना प्रमूख पाहुणे व मार्गदर्शक श्रीमती कोमल शिंदे मॅडम***





***शिवशंभो ग्रूप चे ससेयो स्वंयसेवक स्व:ता होऊन मार्गदर्शक यांना भेट देतांनाच क्षणचित्र.***

*२१/०१/२०२३ रोजी दुपारच्या बौध्दीक सत्रात महिला सक्षमीकरण वास्तव आणि आशावाद याविषयी मार्गदर्शन करतांना डॉ. सुधारक श्रीरामे लोकप्रशासन विभाग, सरस्वती भूवन कॉलेज औरंगपुरा औरंगाबाद या प्रसंगी मंचावर उपस्थित सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विक्रमसिंह पवार सर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. योगेश भाले आदी.*











*उत्कृष्ट मार्गदशन केल्या बद्दल शिवशंभो ग्रूप चे रासेयो स्वंयसेवक स्व:ता होऊन मार्गदर्शक यांना भेट देतांनाच क्षणचित्र.*

दि. २२ जानेवारी २०२३ रोजी रासेयो च्या विशेष शिबीराच्या ६ व्या दिवशी स्वातंत्र्य सैनिक कै. पुंजाजी भागाजी सपकाळ यांच्या स्मरणार्थ मौजे गणेशपूर येथे विशेष शिबीर स्थळी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते या प्रसंगी स्वंयसेविका यांनी रक्तदानाचे महत्व सांगण्यासाठी काढलेली रांगोळी.



विशेष शिबीराच्या ६ व्या दिवशी रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे संचालन करतांना रासेयो स्वंयसेविका या प्रसंगी मंचावर उपस्थित लोकमान्य ब्लड बॅकेचे संचालक श्री. विजय सोनवण महाविद्यालयाचे प्राचार्य, रासेयो कार्यक्रमाधिकारी व स्टाफ



रासेयो विशेष शिबीराच्या ६ व्या दिवशी रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी प्रार्थना घेतांना स्वंयसेवक व स्टाफ.



रासेयो विशेष शिबीराच्या ६ व्या दिवशी रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे उदघाटन राष्ट्रसंत गाडगे महाराज व स्वातंत्र्य सैनिक कै. पुंजाजी भागाजी सपकाळ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले या प्रसगीचे क्षणचित्र

*मंचावर उपस्थित लोकमान्य ब्लड बॅकेचे संचालक श्री. विजय सोनवण महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे स्वागत करतांना स्वंयसेवक*









*रासेयो विशेष शिबीरात स्वंयसेवक व ग्रामस्थाना रक्तदानाचे महत्व सांगतांना डॉ. सुनिल काळे*





*प्रत्येक्ष रक्तदान करतांना मौजे गणेशपूर येथील ग्रामस्थ आणि रासेयो स्वंयसेवक याप्रंसगी उपस्थित प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर व रासेयो कार्यक्रमाधिकारी आणि सहकारी मित्र तसेच स्वंयसेवक स्वंयसेविका आदी.*

*रक्तदान करतांना डॉ.संजय मगर व मौजे गणेशपूर येथील ग्रामस्थ आणि रासेयो स्वंयसेवक याप्रंसगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ. पुरुषोत्तम मनगटे डॉ . राजेश कांबळे डॉ. प्रतिभा आघार्डे डॉ. अनिता खंडागळे श्री विजय सोनवणे आदी.*







*रक्तदान शिबीर स्थिळी उपस्थित डॉ. योगेश भाले, डॉ. यंशवत गाढे, डॉ. उमाकांत गायकवाड आदी.*





*रासेयो च्या विशेष रक्तदान शिबीरात मौजे गणेशपूर येथे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व स्वंयसेवक प्रत्येक्ष रक्तदान करतांना उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य आदरनिय प्रचार्य डॉ. दिनकर टकले सर महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघार्डे व उपस्थित माझे मित्र डॉ. राजेश काबंळे, डॉ. सुनिल काळे.*





*रासेयो च्या विशेष रक्तदान शिबीरात एकून १८ रक्तदात्यांनी स्वंयसेवकासह ग्रामस्थानी रक्तदान केले.*




*स्वंयसेवकांनी रासेयोच्या विशेष रक्तदान शिबरात रक्तदान करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी अशी विविध शिबीरस्थळी पोस्टर तयार केले*

रक्तदान शिबीरानंतर सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी मंचावर उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. पुरुषोत्तम मनगटे



सांस्कृतिक कार्यक्रमात रासेयो शिबीरात स्वंयसेवक व स्वंयसेविका कु. कार्तिकी सपकाळ आणि भाग्यश्री सपकाळ ही नृत्य कला सादर करतांना त्याशिवाय मौजे गणेपूर येथील जि.प.शाळेतील मुलींनी सुध्दा सहभागी होऊन विविध कला सादर केल्या आहेत याप्रसंगीचे क्षणचित्र.





रासेयो शिबीराच्या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य कला सादर करतांना स्वंयसेवक

रासेयो शिबीराच्या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य कला सादर करतांना स्वंयसेवक व स्वंयसेविका.





दि.२२/१/२०२३ रोजी रासेयो विशेष शिबीराच्या सांस्कृतिक कार्यक्रमात गवळण सादर करतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे









रासेयो विशेष शिबीराच्या सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या कॉलेज जीवनातील गॅदरीग चे अनुभव सांगूण कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्रचार्य आदनीय डॉ. दिनकर टकले सर या प्रसंगी उपस्थित रासेयो कार्यकमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, प्रा. प्रतिभा आघार्डे, डॉ. उमाकांत गायकवाड आदी.

"These images depict the work carried out by NSS volunteers during the National Service Scheme Special Camp in the academic year 2022-23. The volunteers were involved in building the water dam at the hill station in Ganeshpur, under the supervision of NSS Coordinator Dr. Gajanan Chittewad and my college colleagues."



























**This is an image collection of the work carried out by NSS volunteers during the National Service Scheme Special Camp for the academic year 2022-23, as they built the water dam at the hill station in Ganeshpur."**

दि. 23/01/23 रासेयो विशेष शिबीर समारोप समारंभ प्रसंगी स्वंयसेवकांनी काडलेले NSS Logo आणि रांगाळी.









रासेयो विशेष शिबीर समारोप समारंभाचे प्रमूख पाहूण्याचे आगमन होत असल्याने ग्रामस्थाना सभामंडमाप मध्ये बसण्याविषयी विनंती करतांना रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ. पुरुषोत्तम मनगटे आदी.



*रासेयो विशेष शिबीर समारोप समारंभाचे प्रमूख पाहूणे रासेयो संचालक डॉ. अंनद देशमूख यांचे शिबीरस्थळी आगमन*





*रासेयो विशेष शिबीर समारोप समारभांची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व रासेयोचे स्वंयसेवक यांच्या स्वागत गीताने करण्यात आली.*





*दिनांक २३/०१/२०२३ रोजी विशेष शिबीर समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर व प्रमूख पाहूणे आणि मार्गदर्शक **डॉ. आनंद देशमूख रासेयो संचालक,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे स्वागत करतांना रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व प्रा. प्रतिभा आघार्डे.*





*रासेयोच्या विशेष शिबीरातील प्रत्येक दिवशी येणा-या प्रमूख पाहूण्याची चहा नाष्टा याची विशेष व्यवस्था केल्याबद्दल श्री नितिन सोळूंके साहेब यांचे शिबीर समारोप समांरभ प्रसंगी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे.*

*रा.से.यो.चे शिबीर समारोप समांरभामध्ये सात दिवशीय अहवाल वाचन करतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी व गट समन्वयक डॉ.गजानन चिट्टेवाड डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या प्रसंगी मंचावर उपस्थित गावातील प्रथम नागरिक, मार्गदर्शक व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर आदी.*




*ग्रामपंचायत सदस्य येथे रा.से.यो. कॉम्प घेवून उत्कृष्ठ उपक्रम राबविल्या बदल मनोगत व्यक्त करतांना. श्री. गिरी साहेब.*




*रा.से.यो विशेष शिबीर समारोप समारंभाचे प्रमूख पाहूणे डॉ. आनंद देशमूख रासेयो संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे स्वंयसेवक व ग्रामस्थाना संबोधीत करतांना.*



***दि. २२ जानेवारी २०२३ रोजी रासेयो च्या विशेष शिबीराच्या ६ व्या दिवशी स्वातंत्र्य सैनिक कै. पुंजाजी भागाजी सपकाळ यांच्या स्मरणार्थ मौजे गणेशपूर येथे विशेष शिबीर स्थळी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते यात एकूण १८ स्वंयसेवक व ग्रामस्थानी रक्तदान केले त्याचे प्रमाणपत्र रा.से.यो विशेष शिबीर समारोप समारंभाचे प्रमूख पाहूणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या हस्ते स्वंयसेवकांना देण्यात आले याप्रसंगी संचालन करतांना डॉ. सुनिल काळे व प्रमाणपत्र घेतांना स्वंयसेवक.***











*विशेष शिबीरात रक्तदान केल्याचे मान्यवराच्या हस्ते प्रमाणपत्र स्विकारतांना डॉ. संजय मगर व स्वंयसेवक या प्रसंगी मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमूख पाहूणे व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड*







*रक्तदान केल्याचे प्रमाणपत्र शिबीर समारोप कार्यक्रमाचे प्रमूख पाहूणे आणि मार्गदर्शक डॉ. आनंद देशमूख रासेयो संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद याच्या हस्ते स्विकारतांना रासेयो स्वंयसेवक या प्रसंगी उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले सर व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड.*

*राष्ट्रीय सेवा योजना विभागातील वर्षेभरातील नियमित कार्यक्रम व रासेयोचे विशेष शिबीर प्रसंगी सात दिवसात रॅली मधील पोस्टर Persentation घोष वाक्य, श्रमसंस्कार शिबीरातील श्रमदान तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग त्याच बरोबर स्टेज सजावट, कार्यक्रमाचे संचालन व नियोजन यात उत्कृष्ठ सहभाग घेऊन कार्यकेल्याबद्दल स्वंयसेवकांना मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहन पर बक्षीस, प्रमाणपत्र व ट्राफी देऊन गौरवण्यात आले याचे काही क्षणचित्रे. सदर Event चे संचालन करतांना कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघार्डे या प्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर*











*विशेष श्रमदान शिबीरात ग्रूप वाईज उत्कृष्ठ कार्यकेल्याबद्दल मंचावर उपस्थित मान्यवराच्या हस्ते बक्षीस स्विकारतांना ग्रूपचे मार्गदर्शक डॉ. संजय मगर, डॉ. अनिता खंडागळे मॅडम व स्वंयसेवक आणि स्वंयसेविका.*

*जळगाव येथील आपत्ती व्यवस्थापन कॅम्प मध्ये सहभागी होऊन विद्यापीठाला तृतिय क्रंमाक मिळवूण देण्यात उत्कृष्ठ योगदान दिल्या बद्दल श्री रुषीकेश पावर, श्री, करण गवारे, कु . कार्तिकी सपकाळ व कु. भाग्यश्री खरात यांचे अभिनंदन करुन ट्राफी व प्रमाणपत्र देतांना रा.से.यो विशेष शिबीर समारोप समारंभाचे प्रमूख पाहूणे डॉ. आनंद देशमूख रासेयो संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*








# विद्यापीठाला 'आव्हान'चे तृतीय बक्षीस

प्रतिनिधी | औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाला आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात तृतीय पारितोषिक मिळाले. मुंबई येथील राज भवनाच्या चॅन्सलर ब्रिगेडतर्फे आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. जळगाव विद्यापीठात ९ ते २८ डिसेंबरदरम्यान २० दिवस शिबिर झाले. विद्यापीठ संघात ५९ मुले, ३९ मुली आणि ७ रासेयो संघप्रमुखांचा सहभाग होता. डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाला शोभायात्रेत तिसरा क्रमांक मिळाला. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र-कुलगुरू डॉ. श्याम शिरसाट, कुलसचिव डॉ. भगवान साखळे, रासेयोचे संचालक डॉ. आनंद देशमुख यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले आहे. संघप्रमुख डॉ. रवींद्र पाटील, डॉ. सपना गायकवाड, डॉ. प्रतिभा आचार्य, प्रा. अनिल नगर यांचा संघात सहभाग होता.

कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी स्वयंसेवकांचा सत्कार केला.

*आव्हान कॅम्प मधील महाविद्यालयाचे सहभागी रासेयो स्वंयसेवक शै.वर्षे २०२२-२३*







***रासेयोच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरात ग्रूप वाईज उत्कृष्ठ सहभाग व श्रमदान केल्याबद्दल मंचावर उपस्थित मान्यवराच्या हस्ते बक्षीस स्विकारतांना ग्रूपचे स्वंयसेवक.***





रा.से.यो विशेष शिबीर समारोप समारंभामध्ये अध्यक्षीय भाषण व सांगता करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले या प्रसंगी मंचावर उपस्थित रासेयो संचालक डॉ. आंनद देशमूख, मौजे गणेशपूर येथील प्रथम नागरिक सरपंच तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड सोबत डॉ . पुरुषोत्तम मनगटे आदी.





रा.से.यो. विशेष शिबीर समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवराचे व ग्रामस्थ, स्वंयसेवक, स्टाफ यांचे आभार व्यक्त करतांना रा.से.यो. समिती सदस्य डॉ. पुरुषोत्तम मनगटे.

*रा.से.यो विशेष शिबीर कार्यक्रमांची सांगता झाल्यानंतर समूह फोटो घेतांना मान्यवर, स्वंयसेवक, ग्रामस्थ, पदाधिकारी आणि स्टाफ आदी.*









*रा.से.यो विशेष शिबीर प्रसंगी सातही दिवश रुचकर नाष्टा व भोजन दिल्या बद्दल आचारी श्री निकम यांच्या रासेयो शिबीर समारोप कार्यक्रमात सत्कार करतांना रासेयो भोजन समिती सदस्य डॉ. यंशवत गाढे.*







***रासेयो विशेष शिबीराची सांगता संपन्न झाल्यानंतर भोजनाचा आस्वाद घेतांना रासेयो संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, ग्रामस्थ, रासेयो कार्यक्रमाधिकारी, सहकारी मित्र, कर्मचारी व स्वंयसेवक आदी.***









*भोजन करतांना रासेयो स्वंयसेवक, स्वंयसेविका व ग्रामस्थ तसेच महाविद्यालयातील स्टाफ.*







*रासेयो विशेष शिबीरात मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वंयसेवकांना देण्यात आलेल्या ट्राफीज.*



*उपरोक्त पध्दतीने रासेयो च्या विशेष सात दिवशीय शिबीराची आनंदाने सांगता करण्यात आली.*

*दै.सकाळ, दै. दिव्य मराठी. दै. लोकमत वृत्तपत्रात रा.से.यो. विशेष शिबीराच्या प्रसिध्द झालेल्या बातम्या.*

सकाळ

# विद्यार्थ्यांनी शिक्षणातून विविध कौशल्य आत्मसात करावे

चिंचोली लिंबाजी, ता. १९ (बातमीदार) : विद्यार्थ्यांनी शिक्षणातून विविध कौशल्य आत्मसात करावे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी डॉ. टी. पी. पाटील यांनी केले आहे.

चिंचोली लिंबाजी (ता. कन्नड) येथील कला व विज्ञान महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशपूर (ता. कन्नड) येथे रा. से. यो. चे सात दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे श्री पाटील म्हणाले की, "युवकांनी पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच विविध व्यवसायाशी निगडित नावीन्यपूर्ण कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. तरच येणाऱ्या काळात आपले अस्तित्व सिद्ध करता येईल.



चिंचोली लिंबाजी : गणेशपूर येथील शिबिरात बोलताना डॉ. टी. पी. पाटील. समोर उपस्थितीत विद्यार्थी.

अध्यक्षस्थानी सरपंच कांचन चरवंडे होत्या तर प्रमुख पाहुण्या इंदिरा पाठक, मराठी विभागप्रमुख डॉ. प्रमिला मुखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मांडले, सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा आघाडे, तर डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी आभार मानले.

यावेळी पूनमताई सोळुंके, अजबसिंग चरवंडे, नितीन सोळुंके, रवींद्र सूर्यवंशी, केशव गिरी, गणेश आंभोरे, ठाणसिंग दादा सोळुंके, भरतसिंग सोळुंके, जुलालसिंग सोळुंके, अशोक पवार, राजू काकरवाल, राजू खोलवाल, किशोर जोशी, बाळू पवार, सुनील गिरी, अंकुश ठाकरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. अनिता खंडागळे, डॉ. योगेश भाले, डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. विक्रमसिंह पवार, डॉ. सुनील काळे, डॉ. यशवंत गाढे, डॉ. राजेश कांबळे, डॉ. संजय मगर, डॉ. वंदना बनकर, डॉ. वंदना पाटील, डॉ. संजय वाकळे, डॉ. रामेश्वर राऊत, कार्तिकी सपकाळ, भाग्यश्री खरात, कोमल साळवे, वैशाली काथार आदींनी पुढाकार घेतला.

Aurangabad, District-Today
20/01/2023 Page No. 4

दिव्य मराठी

## औरंगाबाद जिल्हा 19-01-2023

# कला, विज्ञान महाविद्यालयाचे गणेशपूर येथे रासेयो शिबिर



गणेशपूर येथे रा.से.यो कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.टी.पी.पाटील

**प्रतिनिधी | शेलगाव**

चिंचोली लिंबाजी येथील कला व विज्ञान महाविद्यालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशपूर येथे आयोजित सात दिवशीय रासेयो शिबिराचे उद्घाटन डॉ. टी. पी. पाटील यांच्या हस्ते झाले.

डॉ. टि.पी. पाटील म्हणाले, की युवकांनी पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच विविध व्यवसायाशी निगडित नाविन्यपूर्ण कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे तरच येणाऱ्या काळात आपले अस्तित्व सिद्ध करता येईल. अध्यक्षस्थानी सरपंच कांचन चरवंडे होत्या तर प्रमुख पाहुण्या इंदिरा पाठक महाविद्यालय औरंगाबादच्या मराठी विभागप्रमुख डॉ.प्रमिला मुखेडकर होत्या. त्या म्हणाल्या की मुलींनी शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे. तदनंतर विवाहाचा विचार करावा तरच खऱ्या अर्थाने आपण सुखी संसार करू शकतो. प्राचार्य डॉ.दिनकर टकले यांनी विद्यार्थ्यांनी तज्ञांचे विचार ऐकून आपल्या जीवनात काळानुरूप परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे असे सांगितले. पाहुण्यांचे स्वागत,कार्तिकी सपकाळ, भाग्यश्री खरात,कोमल साळवे, वैशाली काथार यांनी स्वागत गीत गाऊन केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्रतिभा आघाडे यांनी केले आभार डॉ.पुरुषोत्तम मनगटे यांनी मानले.

यावेळी पूनम ताई सोळुंके,आजबसिंग चरवंडे,नितीन सोळुंके,रवींद्र सूर्यवंशी,केशव गिरी,गणेश आंभोरे,ठाणसिंग दादा सोळुंके, भरत सिंग सोळुंके,जुलालसिंग सोळुंके,अशोक पवार,राजू काकरवाल,राजू खोलवाल,किशोर जोशी,बाळू पवार,सुनील गिरी,अंकुश ठाकरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ.अनिता खंडागळे, डॉ.योगेश भाले, डॉ. उमाकांत गायकवाड,डॉ.विक्रमसिं ह पवार,डॉ.सुनील काळे,डॉ.यशवंत गाढे,डॉ.राजेश कांबळे,डॉ.संजय मगर,डॉ.वंदना बनकर, डॉ.वंदना पाटील,डॉ.संजय वाकळे,डॉ. रामेश्वर राऊत यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर बनणे आवश्यक

## सपोनि कोमल शिंदे : गणेशपूर येथील शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**चिंचोली लिंबाजी, ता. २१ (बातमीदार):** ग्रामीण भागातील विद्यार्थिनींचा शिक्षणासोबत आत्मनिर्भर बनणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पिशोर पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक कोमल शिंदे यांनी केले आहे.

चिंचोली लिंबाजी (ता.कन्नड) येथील कला व विज्ञान महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत गणेशपूर (ता.कन्नड) येथे सात दिवसीय विशेष शिबिरात त्या बोलत होत्या. पुढे सपोनि. शिंदे म्हणाल्या की, आजही ग्रामीण भागातील विद्यार्थिनी या स्वावलंबी दिसून येत नाही. त्यामुळे आज विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे तरच त्या आपल्या अस्तित्व निर्माण करू शकतील हे पटवून देण्यासाठी त्यांनी अनेक उदाहरणे दिली.

यानंतर एस. बी. महाविद्यालय औरंगाबाद येथील डॉ. सुधाकर श्रीरामे, डॉ. विक्रमसिंह पवार यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाग्यश्री खरात, आभार प्रदर्शन करण गवारे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत सीमा गायकवाड, कार्तिकी सपकाळ, कोमल साळवे यांनी केला.



**चिंचोली लिंबाजी :** गणेशपूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना कोमल शिंदे. समोर उपस्थित विद्यार्थी.

याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. पुरुषोत्तम मनगटे, डॉ. योगेश भाले, डॉ. राजेश कांबळे, डॉ. संजय वाकळे, डॉ. संजय मगर, डॉ. अनिता खंडागळे, डॉ. वंदना पाटील, डॉ. रामेश्वर राऊत, डॉ. यशवंत गाडे, आदिनाथ मनगटे, कैलास पवे आदींची उपस्थिती होती.

Aurangabad, District-Today
22/01/2023 Page No. 3